# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(सामान्य प्रशासन)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय : ०७१२–२५२२९९१, फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्रमांक: रातुमनावि/साप्र/स/2484

दिनांक: ६ ऑक्टोबर २०१७

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या
सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य

**विषय:** भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस, "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याबाबत.

**संदर्भ:** मा. ना. श्री. विनोद तावडे, मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २९ सप्टेंबर २०१७ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

मा. ना. श्री. विनोद तावडे, मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई यांनी उपरोक्त विषयांकीत संदर्भिय पत्रान्वये, भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस (१५ ऑक्टोबर) हा **'वाचन प्रेरणा दिन'** म्हणून गेल्या दोन वर्षापासून महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने साजरा होत असल्याचे, त्यानुसार याही वर्षी (२०१७) वाचन प्रेरणा दिन उत्साह आणि गांभीर्यासह साजरा करावयाचे असल्याचे, परंतु दिनांक १५ ऑक्टोबर २०१७ रोजी सार्वजनिक सुटी असल्याने, यंदाचा वाचन प्रेरणा दिन हा सर्व शाळा – महाविद्यालये – शैक्षणिक संस्था व शासकीय कार्यालये यांनी **शुक्रवार दिनांक १३ ऑक्टोबर २०१७** रोजी तसेच, सार्वजनिक व खाजगी ग्रंथालये, साहित्यिक/सांस्कृतिक संस्था यांनी रविवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१७ रोजी साजरा करावा, असे कळविले आहे.

संदर्भिय पत्राची प्रत आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडून पाठविण्यात येत असून आपणास विनंती करण्यात येते की, संदर्भिय पत्रात नमूद उपक्रमानुसार भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन, **"वाचन प्रेरणा दिन"** म्हणून आपल्या महाविद्यालयात वरील प्रमाणे साजरा करावा व आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची माहिती व छायाचित्रासह अहवाल vinodtawdewpd2017@gmail.com या ई–मेल आयडीवर किंवा संदर्भिय पत्रात नमूद केलेल्या कार्यालयीन पत्त्यावर पाठवावा.

आपला

(पुरणचंद्र मेश्राम)
प्र. कुलसचिव

सहपत्र: वरील प्रमाणे.

Subject: **Fwd: वाचन प्रेरणा दिन दिमाखात आणि गांभीर्यासह साजरा करण्याबाबतचे मा.ना.श्री. विनोद तावडे यांचे पत्र.**

To: registrar@nmu.ac.in, registrar.nmu@gmail.com, drpvjabde@gmail.com, registrar@bamu.ac.in, registrar@fort.mu.ac.in, dineshbhonde1@gmail.com, meshram.puran@gmail.com, registrar@nagpuruniversity.nic.in, regis@unipune.ac.in, srtmunregistrar@gmail.com, registrar@sus.ac.in, registrar@unishivaji.in, vdn.registrar@unishivaji.in, snbharambe@gmail.com, registrar@sndt.ac.in

Date: 10/04/17 04:32 PM

From: मा. ना. श्री. विनोद तावडे <vinodtawdewpd2017@gmail.com>

लोगो पोस्टर.jpg (490kB) वाचन प्रेरणा दिन-साहेबांचे पत्र...jpg (418kB) वॉटस्अॅप लोगो.jpg (642kB)
उपक्रम सूची पीडीएफ.pdf (714kB) फक्त उपक्रम सूची.docx (18kB) लोगो पोस्टर पीडीएफ.pdf (1.9MB)
वाचन प्रेरणा दिन साहेबांचे पत्र पीडीएफ.pdf (223kB)

नमस्कार,

गेल्या वर्षी आपण सर्वांनी वाचन प्रेरणा दिन उत्साहाने साजरा करून डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे सार्थ स्मरण केले. याही वर्षी आपल्याला वाचन प्रेरणा दिन दिमाखात आणि गांभीर्यासह साजरा करायचा आहे.

या मेलसोबत माझे पत्र आणि उपक्रम सूची पाठवत आहे. तसेच वाचन प्रेरणा दिनाचे बोधचिन्ह (लोगो) पाठवत आहे.

**यथोचित कार्यक्रम / उपक्रम आयोजित करून आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर कार्यक्रमाचा छायाचित्रांसह अहवाल या ई-पत्त्यावर जरुर पाठवावा.**

सोबत वाचन प्रेरणा दिनाच्या बोधचिन्हाच्या, सूचीच्या अनेक धारिका (पीडीएफ व ओपन फाईल्स) जोडल्या आहेत. त्यांचा योग्य पद्धतीने वापर करावा.

आपणां सर्वांना वाचन प्रेरणा दिनाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!

सोबत- विविध धारिका (फाईल्स)

**- विनोद तावडे**

DR (GA)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 688 दिनांक 4/10/17
लोगो पोस्टर 688 दिनांक 4/10/17

684 4/10/17
684




—वॉटस्अ

--वाचन प्रेरणा दिन-साहेबांचे पत्र...jpg

मंत्री

महाराष्ट्र शासन

विनोद तावडे
मंत्री
शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण,
उच्च व तंत्र शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य,
अल्पसंख्याक विकास व वक्फ
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक २९ सप्टेंबर, २०१७

प्रिय नमस्कार!

भारताचे माजी राष्ट्रपती दिवगत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस (१५ ऑक्टोबर) हा 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून, गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने साजरा होत आहे. याही वर्षी (२०१७) आपल्याला वाचन प्रेरणा दिन उत्साह आणि गांभीर्यासह साजरा करायचा आहे.

दि. १५ ऑक्टोबर रोजी सार्वजनिक सुटी असल्याने, यंदाचा वाचन प्रेरणा दिन हा सर्व शाळा - महाविद्यालये - शैक्षणिक संस्था व शासकीय कार्यालये यांनी शुक्रवार, दि. १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी तसेच, सार्वजनिक व खाजगी ग्रंथालये, साहित्यिक / सांस्कृतिक संस्था यांनी रविवार, दि. १५ ऑक्टोबर, २०१७ रोजी साजरा करावा.

व्यक्तिमत्त्व विकास, साहित्य विकास आणि भाषाविकास यासाठी वाचन संस्कृतीचा विस्तार आणि विकास करणे अत्यावश्यक आहे. पुस्तकांचे गाव हा अभिनव प्रकल्प, निवडक गटांना ग्रंथपेट्यांचे वितरण, सार्वजनिक कार्यक्रमांत पुस्तके भेट देण्याच्या शासन निर्णयाची आग्रही अंमलबजावणी अशा माध्यमांतून शासन वाचन संस्कृतीबाबत कार्यरत आहे. या पार्श्वभूमीवर आपण प्रत्येकाने वाचन संस्कृती चळवळीत सहभाग घेणे अत्यावश्यक आहे.

https://mail.gov.in/iwc_static/layout/shell.html?lang=en-IN&3.0.1.2.0_15121607 04-10-2017

सर्व माध्यमाच्या व सर्व मंडळाच्या (बोर्डाच्या) शाळा, सर्व अनुदानित महाविद्यालये, ग्रंथालये, साहित्यिक-सांस्कृतिक संस्था, प्रकाशक-लेखक-पुस्तक वितरक, युवक व युवकांच्या अशा सर्वच घटकांनी वाचन प्रेरणा दिनी कार्यक्रम-उपक्रम योजावेत, असे आवाहन मी शासनाच्या वतीने करीत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वसामान्य नागरिकही या उपक्रमास भरघोस प्रतिसाद देतील, अशी माझी खात्री आहे.

सोबत उपक्रम सूची जोडली आहे, आपणही आपल्या कल्पनाशक्तीनुसार नावीन्यपूर्ण उपक्रम योजू शकता. **'उपस्थितांचा (विद्यार्थी / रसिक वाचकांचा) सहभाग' हे सूत्र कार्यक्रम योजताना आवर्जून लक्षात ठेवावे. तसेच हा उपक्रम साजरा करीत असताना परीक्षार्थींना त्रास होणार नाही याची विशेष काळजी घ्यावी.**

वाचन प्रेरणा दिनाच्या उपक्रमात आपला सार्थ आणि सक्रिय सहभाग आपण नोंदवालच, या खात्रीसह आपणा सर्वांना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा!

**सहपत्र : तपशीलवार उपक्रम सूची**

आपला,

(विनोद तावडे)

---

टीप : आपण ठरविलेल्या कार्यक्रमाची माहिती आणि कार्यक्रमाचे फोटो आपल्या कार्यक्रमाच्या छायाचित्रांसह अवश्य vinodtawdewpd2017@gmail.com या ई-पत्त्यावर किंवा व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर अवश्य पाठवावा.

—वॉटस्अ‍ॅप लोगो.jpg




2017

ए.पी.जे. अब्दुल क